भारत-कॅनडा परराष्ट्र कार्यालयीन सल्लामसलत

02 सप्टेंबर 2026 रोजी, भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातील अधिकारी आणि ग्लोबल अफेयर्स कॅनडाचे अधिकारी यांच्यामध्ये नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे वार्षिक परराष्ट्र कार्यालयीन सल्लामसलत पार पडली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व सचिव (पूर्व) श्री. रुद्रेंद्र टंडन यांनी केले, तर कॅनडाच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र व्यवहार उपमंत्री श्री. अरुण थंगराज यांनी केले.

2. जून 2025 पासून उच्च-स्तरीय आदानप्रदानाला मिळालेली गती आणि द्विपक्षीय सहकार्याच्या विविध क्षेत्रांत झालेली प्रगती यांतून दिसून येणाऱ्या द्विपक्षीय संबंधांतील सातत्यपूर्ण सकारात्मक प्रगतीच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा झाली.

3. सामायिक लोकशाही मूल्ये, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेच्या तत्त्वांचा आदर तसेच कायद्याच्या प्रती असलेली संयुक्त बांधिलकी या आधारांवर भारत-कॅनडा संबंधांचे महत्त्व उभय बाजूंनी पुन्हा अधोरेखित करण्यात आले. ऊर्जा आणि महत्त्वपूर्ण खनिजे, विज्ञान आणि तंत्रज्ञान, शिक्षण, सुरक्षा आणि संरक्षण सहकार्य, संस्कृती, जनतेतील परस्पर संबंध तसेच वाणिज्य दूत विषयक बाबी यांसह विविध संस्थात्मक यंत्रणांच्या कामकाजातील प्रगतीचा दोन्ही बाजूंनी आढावा घेण्यात आला. दोन्ही देशांमधील संस्थात्मक स्तरावरील संवाद आणि सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दिशेने झालेल्या प्रगतीचे उभय बाजूंनी स्वागत केले.

4. 2030 पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुपटीहून अधिक वाढवून 70 अब्ज कॅनेडियन डॉलर / ₹4.65 लाख कोटींपर्यंत नेण्याच्या सामायिक उद्दिष्टासह, सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराच्या (CEPA) वाटाघाटी, वर्ष संपण्यापूर्वी पूर्ण करण्याच्या आपल्या सामायिक बांधिलकीचा उभय बाजूंनी पुनरुच्चार केला.

नवी दिल्ली

02 सप्टेंबर 2026